# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.

क्र.पु.वि.मं./शाखा-क/ 1259
पुणे ४११ ००५.
दि. १५.०१.२०१९

## प्र क ट न

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
जिल्हा- पुणे/अहमदनगर/सोलापूर.

**विषय**- शास्त्रीय कला/चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत...

**संदर्भ**- १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२/दि.२४.११.२०१७
२) क्रमांक-रा.मं./परीक्षा-७/१६४, दि.११.०१.२०१९ चे पत्र.
३) शासन निर्णय क्र.संकीर्ण ८२१८/प्र.क्र.२९९/सां.का.४, दि.०३.११.२०१८

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आदींना सूचित करण्यात येते की, कला (नृत्य/गायन/वादन), चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या व लोककला प्रकारात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त वाढीव गुण देण्याबाबत शासन पत्र क्र.संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०२/एसडी-२ शालेय शिक्षण विभाग दि.२४.११.२०१७ नुसार व दि.०३.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार जे विद्यार्थी कला/चित्रकला गुण सवलत घेण्यास पात्र आहेत अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्यापूर्वी खालील सूचनांचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही करुन शाळेमार्फत सादर करण्यात यावेत.

१) दि.०३.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील संस्थांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (परिशिष्ठ अ)
२) दोन वेगवेगळया संस्थांमधून विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केल्या असल्यास दोन्ही संस्था शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या असणे आवश्यक आहे. दोन संस्थांमधून परीक्षा दिलेल्या असल्यास ३री/५वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेने आधीच्या अन्य संस्थांकडील (शासन निर्णयात नमूद असलेल्या) प्रमाणपत्र प्रमाणित करणे आवश्यक आहे.
३) शासन निर्णयानुसार ३री व ५ वी परीक्षा विद्यार्थ्याने इ.७वी ते १०वी या इयत्तांमध्ये शिकत असतांना उत्तीर्ण केलेली असावी.
४) शासन निर्णयानुसार गुणपत्रक १ ते ३/१ ते५ अशा सर्व परीक्षांचे प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रमाणपत्र किमान ३-या/५व्या परीक्षेचे आवश्यक राहील.
५) दि.२४.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयासोबतचे परिशिष्ठ अ संबंधित संस्थांनी त्यांच्या संस्थेच्या लेटरहेड वर न देता सदर प्रमाणपत्रावर संस्थेचा मूळ शिक्का व स्वाक्षरी करुन द्यावी.
तसेच शास्त्रीय संगीत, नृत्य व वादन तसेच लोककला क्षेत्रातील दोन संस्थांनी प्रमाणपत्र देण्याकरिता विशेष बाब म्हणून (१)सर फोजी राजे भोसले, मुंबई (२)लोकरंग सांस्कृतिक मंच, ठाणे या संस्थांची निवड करण्यात आली आहे.

सदर माहिती संबंधित विद्यार्थी/पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. व कोणताही विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संबंधित मुख्याध्यापकांनी घ्यावी.

15/01/2019
**विभागीय सचिव,**
**पुणे विभागीय मंडळ,**
**पुणे ४११ ००५.**

**प्रत माहितीसाठी**
**मा.शिक्षणाधिकारी (माध्य.) पुणे/अहमदनगर/सोलापूर.**

43 prakatan